# पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. : १२८/२०११

**विषय : प्राश्निकांना ECS सुविधेव्दारे तात्काळ मानधन अदा करण्याबाबत..**
**संदर्भ : वित्त व लेखा विभाग पत्र क्र. वित्त/२०११-१२/४८४, दिनांक २७.७.२०११.**

आपणांस विदित आहे की, विद्यापीठाने नियुक्त केलेल्या प्राश्निकांना (Paper Setters) त्यांच्या कामाचे मानधन धनादेशाव्दारे अदा करण्यात येत असते. सदर धनादेशाव्दारे मिळणारी रक्कम प्रत्यक्ष खात्यात जमा होईपर्यंत काही कालावधी लागत असतो. विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजात गतिमानता येण्याच्या दृष्टीने व प्राश्निकांना मानधन त्वरित अदा करण्यासाठी ECS सुविधेव्दारे रक्कम, संबंधितांच्या बँक खात्यावर त्वरित जमा करण्याचे ठरविण्यात आले आहे.

याबाबत या परिपत्रकान्वये आपणांस कळविण्यात येते की, ECS सुविधेचा लाभ घेण्यासाठी, आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्थेत कार्यरत असलेल्या प्राश्निकांचे राष्ट्रीयकृत बँकेत प्राधान्याने बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये खाते असणे आवश्यक आहे. एप्रिल/मे, २०११ पासून होणा-या सर्व प्राश्निकांचे मानधन सदर सुविधेव्दारे अदा करावयाचे असल्यामुळे सर्व प्राश्निकांची बँक खात्याची माहिती सोबत जोडलेल्या विहित नमुन्याप्रमाणे भरुन प्राश्निकांच्या क्लेमसोबत जोडणे आवश्यक आहे.

तरी मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था, मा. विभागप्रमुख, सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग यांना विनंती की, वरील परिपत्रकाचा आशय आपल्या महाविद्यालय/संस्थेतील/विभागातील सर्व प्राश्निकांच्या व सर्व संबंधितांच्या नजरेस आणून द्यावा व विद्यापीठास नेहमीप्रमाणेच परीक्षा आयोजनाच्या कामास सहकार्य करावे.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. }
संदर्भ : परीक्षा/समन्वय/८४२ }
दिनांक : ०३ ऑगस्ट, २०११ }

(डॉ.शि.मो.आहिरे)
परीक्षा नियंत्रक

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.
२. मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था.
३. मा.विभागप्रमुख, सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग.
४. मा.वित्त व लेखा अधिकारी

University of Pune
Ganeshkhind Road,
Pune – 411 007

BANK ACCOUNT INFORMATION

**1) Name of the Account Holder :** ………………………………………………

**2) Name of the College / Institute :** ………………………………………………

**3) Permanent Address :** ………………………………………………

**4) E-mail-Id :** ………………………………………………

**5)**

**i) Telephone No. :** ………………………………………………

**ii) Mobile No.:** ………………………………………………

**6) Pan No. :** ………………………………………………

**7) Faculty :** ………………………………………………

**8) Name of the Bank :** ………………………………………………

**Branch :** ………………………………………………

**Address :** ………………………………………………

**9) Bank Account No. :** ………………………………………………

**Bank A/c Type : Saving / Current** ………………………………………………

**10) Branch Code :** ………………………………………………
**( In case of Nationalised bank other than Bank of Maharashtra.)**

**11) IFSC :** ………………………………………………

**12) MICR Code :** ………………………………………………

Date :

Place : Signature

CERTIFICATE FROM THE BANK MANAGER

**I hereby certify that Bank, Branch, Account No. & other Bank details of the Account holder are correct.**

Branch Manager Signature
Seal